दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक ३०७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.१ फेब्रुवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार कोरोनामुक्त

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार ७ दिवसांच्या उपचारानंतर अखेर कोरोनामुक्त झाले आहेत. पवारांची कोरोना चाचणी निगेटिव्ह आली असल्याची माहिती खुद्द शरद पवारांनीच ट्विटरवरुन दिली. कोरोनामुक्त झाल्यानंतर पवारांनी डॉक्टर, मित्रपरिवार, सहकारी आणि शुभचिंतकांचे आभार मानले आहेत ज्यांनी पवारांच्या निरोगी आरोग्यासाठी आणि लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना केली होती.



मागील २४ जानेवारी रोजी शरद पवारांनी कोरोना संसर्ग झाल्याची माहिती ट्विटरवरुन दिली होती. पवारांच्या ट्विटनंतर महाराष्ट्रातील सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या नेत्यांनी त्यांना लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना केली होती. विविध क्षेत्रांतील मंडळीकडून पवारांच्या तब्येतीबद्दल विचारपूस होत होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही शरद पवारांना कोरोना संसर्ग झाल्यानंतर तातडीने त्यांना फोन करुन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

# दहावी, बारावी परीक्षा ऑनलाईन घेण्यासाठी राज्यभरात विद्यार्थी रस्त्यावर



**दै.रायगड नगरी । मुंबई**

दहावी, बारावीच्या परीक्षा ऑफलाईन नको, ऑनलाईन हवी या मागणीसाठी विद्यार्थी राज्यभरात आज रस्त्यावर उतरले आहेत. नागपूर, उस्मानाबाद, मुंबई, औरंगाबादसह विविध शहरांत विद्यार्थ्यांसह काही कार्यकर्त्यांनी हुल्लडबाजी केल्याचे समोर आले आहे. युट्यूबर हिंदुस्थानी भाऊच्या आवाहनानंतर हे विद्यार्थी ठिकठिकाणी जमले होते, असे या विद्यार्थ्यांनी सांगितले.

या विद्यार्थ्यांनी नागपूरसह काही भागात हुल्लडबाजी केली. नागपूरमध्ये विटांद्वारे स्कूटल बसच्या काचा फोडण्यात आल्या. विद्यार्थ्यांना पांगविण्यासाठी पोलिसांना बळाचा वापर करावा लागला. यावेळी विद्यार्थ्यांची मागणी ही ऑफलाईन परीक्षा नको तर ऑनलाईन घेण्यात याव्यात अशी होती.

राज्यात कोरोना रुग्णांची संख्या वाढतच आहे. याच्या प्रादुर्भावामुळे सर्व कार्यालयीन कामकाज ऑनलाईन पद्धतीने सुरू आहे. विद्यार्थ्यांचे शिक्षणही ऑनलाईन सुरू आहे. मग, विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात घालून १० वी १२ वीच्या बोर्ड परीक्षा ऑफलाईन का घेतल्या जात आहेत, असा संतप्त सवाल विद्यार्थ्यांनी उपस्थित केला आहे. कोरोनाचा धोका पाहता बोर्डाच्या परीक्षा ऑनलाईन घेण्यात याव्यात या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी आज नागपुरातील ट्रिलीयम मॉल मेडिकल चौकात आंदोलन केले. राज्यातील सर्वच विद्यापीठांच्या परीक्षा ऑनलाईन होवू शकतात. मग, १० वी, १२ वीच्या बोर्ड परीक्षासुद्धा ऑनलाईन व्हायला हव्यात, अशी मागणीपर विनंती या विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्राद्वारे केली आहे.

कोरोनाच्या संसर्गामुळे राज्यातील सर्व शाळा गेली २ वर्ष बंद आहेत. व ऑनलाईन पद्धतीने शिक्षण सुरू आहे. परंतू, याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर पडला आहे. ऑनलाईन क्लासेस प्रत्येकाला अटेंड करणे शक्य नसल्याने अनेक विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम सुटला आहे, अशा विद्यार्थ्यांचा विचार करण्यात यावा, असेही या विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

प्रात्यक्षिक परीक्षा विद्यार्थ्यांना शाळेत बोलावून घेतल्या जाणार आहेत, हा विद्यार्थ्यांच्या जीवाला असणाऱ्या धोक्याचा इशारा आहे. ह्याबाबत देखील पुर्नविचार करावा, अशी विनंती या विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्रकाच्या माध्यमातून केली आहे.

## घारापुरी पर्यटन स्थळाला स्वतंत्र प्रशासकीय घटक घोषित करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील घारापुरी हे जागतिक कीर्तीचा दर्जा लाभलेले पर्यटन क्षेत्र आहे. समुद्राच्या चारही बाजूने वेढलेले हे बेट आहे. त्या अनुषंगाने समुद्राची सफर तसेच कोरोव लेणी पाहण्यासाठी बेटावर देश विदेशातून पर्यटक मोठ्या प्रमाणात येत असतात आणि घारापुरी येथील ग्रामस्थांचा उदरनिर्वाह हा १०० टक्के पर्यटनावर अवलंबून असतो. पर्यटक हेच एकमेव रोजगाराचे व उपजीविकेचे साधन आहे. तसेच पर्यटका व्यतिरिक्त बेटावरील ग्रामस्थांना अन्य कोणतेही रोजगाराचे साधन नाही. त्यामुळे शासनाने घारापुरी बेटाला स्वतंत्र प्रशासकीय घटक घोषित करून पर्यटन सुरु ठेवून घारापुरीतील स्थानिक ग्रामस्थांना रोजगार उपलब्ध करून द्यावा अशी मागणी घारापुरीचे सरपंच बळीराम ठाकूर यांनी प्रशासनाकडे केली आहे.

देशात आणि राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव पुन्हा वाढू लागल्यामुळे पर्यटन स्थळे बंद करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. परंतु एन हंगामात बंदी लागू केल्याने घारापुरी या पर्यटन क्षेत्रावर आधारित अर्थचक्र पूर्णतः ठप्प झाले आहेत. तसेच सरसकट पर्यटन क्षेत्र बंद केल्याने बेटावरील लोकल गार्ड, हस्तकला, वस्तू विक्रेते, लघु उद्योजक, स्टॉल धारक, हॉटेल व्यावसायिक तसेच पर्यटकावर आधारित बेटावरील सर्व भागधारकांवर रोजगाराविना उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे सरसकट बंदी ऐवजी निर्बंधासह व्यवसाय करण्याची मुभा दिल्यास येथील ग्रामस्थांना रोजगार उपलब्ध होईल. या आधी कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाकडून मार्च २०२० रोजी पासून पुकारलेल्या पर्यटकबंदी मुळे घारापुरी येथील ग्रामस्थ एक ते दिड



वर्षापासून बेरोजगार झाले आहेत. त्यामुळे आताच कुठे पर्यटन क्षेत्र सुरु होऊन बेटावर पर्यटकांची रेल–चेल सुरु असतानाच पुन्हा पर्यटन क्षेत्र बंद झाल्याने ग्रामस्थांवर बेरोजगाराची आपत्ती कोसळली आहे.

त्यामुळे घारापुरी पर्यटन क्षेत्राला स्वतंत्र प्रशासकीय घटक म्हणून घोषित करून सदरचे पर्यटन क्षेत्र सुरु ठेवल्यास येथील ग्रामस्थांना दिलासा मिळेल अशी मागणी घारापुरीचे सरपंच बळीराम ठाकूर यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, पर्यटन तथा पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री आदिती तटकरे, खा. श्रीरंग बारणे, माजी आमदार मनोहर भोईर आदींना पत्रव्यवहार करून केली आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अधिपत्याखाली एखाद्या पर्यटन स्थळास स्वतंत्र प्रशासकीय घटक घोषित करू शकतील असे निर्देश शासनाकडून देण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने घारापुरी या उरण तालुक्यातील जगप्रसिद्ध बेटाची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता बेटावर अन्य कुठेही, कोणतेही रोजगाराचे साधन नसल्याने सदरचे पर्यटन क्षेत्र सुरु ठेवण्याकरिता रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी निर्देशित केल्यास घारापुरी ग्रामस्थांना दिलासा मिळणार आहे.

## वेश्या व्यवसायासाठी परराज्यातून आणलेल्या सहा मुलींची सुटका

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वेश्या व्यवसाय करण्यासाठी परराज्यातून आणलेल्या सहा मुलींची अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक गुन्हे अन्वेषण विभागाने नवीन पनवेल परिसरातून सुटका केली आहे.

नवीन पनवेल परिसरातील सेक्टर ७ या ठिकाणी साधारण दोन महिन्यापूर्वी रो–हाऊस भाड्याने घेवून दोन इसमांनी त्या ठिकाणी राजस्थान, उत्तरप्रदेश व दिल्ली या ठिकाणावरुन सहा मुली आणल्या होत्या. सदर मुलींना लेडीज बारमध्ये तसेच ज्या प्रमाणे गिऱ्हाईक असतील अशांकडे पाठविण्यात येत असे. याबाबतची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक पराग सोनावणे यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने सदर रो–हाऊसवर छापा टाकून त्या ठिकाणावरुन सहा मुलींना ताब्यात घेतले आहे. यामध्ये दोन मुली अल्पवयीन असल्याचे समजते.

## शेतकऱ्यांच्या मागण्याचे निवेदन उपविभागीय अधिकाऱ्यांना दिल्यानंतरच आंदोलनाची दिशा ठरणार

**दै.रायगड नगरी । उरण**

एमएमआरडीए विरार–अलिबाग महामार्गासाठी उरण तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांच्या मागण्याचे निवेदन उपविभागीय अधिकारी यांना देऊन पुढील आंदोलनाची दिशा ठरविली जाईल, अशी भूमिका सर्व बाधित शेतकऱ्यांनी या बैठकी प्रसंगी मांडली आहे.

एमएमआरडीए च्या विरार – अलिबाग या बहुउद्देशीय महामार्गाच्या भूमापणाला कडाडून विरोध केल्यानंतर तहसिल कार्यलय येथे उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके यांच्या सोबत बैठक झाली. शेतकऱ्यांची सहमती मिळविण्यासाठी एका आठवड्याची मुदत देण्यात आली होती त्यानुसार आज उरण तालुक्यातील १६ गावांची बैठक चिरनेर येथिल पी पी एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात बैठक घेण्यात आली.

या बैठकी दरम्यान अनेक शेतकऱ्यांसह उपस्थित मान्यवरांनी आपली मते मांडून आपली भूमिका व्यक्त केली. या बैठकीत संतोष पवार यांनी आपली भूमिका मांडताना या महामार्गाच्या पहिली सुनावणी पनवेल येथील पिल्ले कॉलेज मध्ये १६ जानेवारी ला झाली त्यामध्ये असणारे उपविभागीय




अधिकारी दत्ततेय नवले यांना ती सुनावणी त्यांच्या तोंडुन रद्द करावी लागली त्यानंतर त्यानंतर त्यांनी पुढे काय केले हे कोणालाच काहीही माहीत नाही. शेतकऱ्यांना पूर्ण अंधारात ठेवले गेले आहे.

२०१७ ला जर जासईच्या शेतकऱ्यांना प्रति गुंठा २२ लाख ९५ हजार जमिनीचा मोबदला दिला असेल तर २०२२ मध्ये आम्ही शेतकऱ्यांनी कमी का ह्यवा या पेक्षा जास्त मोबदला का घेऊ नये अशी भूमिका ऍड विजय पाटील यांनी मांडली आहे.या बैठकीत अनेक मुद्यांवर चर्चा करण्यात आली ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी प्रकल्पासाठी संपादित केल्या जातील त्या जमिनीचा मोबदला तीन वर्षमधील एमएसआरडीसी एमटीएचएल नॅशनल अथोरिटी यांनी प्रति चौरस मीटर भाव दिला आहे.

त्याच्या २५ टक्के भाव या महामार्गाला वाढवून देण्यात यावा, शेतकऱ्यांचे योग्य पुनर्वसन तसेच शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्त दाखला देण्यात यावा, महामार्गालागत येणाऱ्या व्यवसायामध्ये भागीदारी मिळावी, महामार्गाचे नियोजन करताना राहती घरे वगळून नियोजन करावे, महामार्गामुळे दुतर्फा असणारी शेती नापिक होणार

.../२

## संक्षिप्त...

### मुंबई, ठाणे, कल्याणची वाहतूक कोंडी आणि प्रदूषण कमी होणार : नितिन गडकरी

**कल्याण : वृत्तसंस्था**

दिल्ली ते जेएनपीटी हायवेचे काम सध्या सुरु आहे. हा हायवे बांधून तयार झाल्यावर दिल्ली ते मुंबई हे अंतर अवघ्या १२ तासात पार करता येणार. याशिवाय या हायवेमार्गे अवजड वाहने शहराच्या बाहेरुन मार्गस्थ होतील. त्यामुळे मुंबई, ठाणे, कल्याण शहरातील वाहतूक कोंडी आणि प्रदूषण कमी होण्यास मदत होईल असा विश्वास केंद्रीय परिवहन मंत्री नितिन गडकरी यांनी व्यक्त केला.

कल्याणच्या सुभेदार वाडा कट्टय़ाच्या वतीने स्वर्गीय नेते राम कापसे व्याख्यानमाले निमित्त ऑनलाईन श्रोत्यांशी संवाद साधताना केंद्रीय मंत्री गडकरी यांनी उपरोक्त माहिती दिली आहे. मंत्री गडकरी यांनी सांगितले की, देशाला पुढे नेण्यासाठी उद्योग आणि शेती अधिक विकसीत करावी लागेल. त्यासाठी पाणी, इंधन, वाहतूकीची साधणो आणि कम्यूनिकेशन यात नवनवे प्रयोग करावे लागतील. रस्ते आणि रेल्वे वाहतूकीपेक्षा जलवाहतूकीचा खर्च कमी आहे.

## ॲड.नईमा घट्टे यांच्या पनवेल कार्यालयाचे परेश ठाकूर यांच्या हस्ते उदघाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अलिबागच्या युवा विधिज्ञ नईमा इमरान घट्टे यांच्या पनवेल मधील नव्या कार्यालयाचे उदघाट्न पनवेल महानगर पालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अलिबागचे नगराध्यक्ष प्रशांत नाईक उपस्थित होते.





पनवेल न्यायालयात होणाऱ्या कामकाजमध्ये असंख्य प्रकरणे असतात. गोरगरीब नागरिक ग्रामस्थ तसेच विविध लोकांना कायदेशीर प्रक्रियेत या कार्यालयाचा उपयोग होईल असे मत परेश ठाकूर यांनी व्यक्त केले. प्रशांत नाईक यांनी देखील शुभेच्छा पर विचार मांडले. यावेळी भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष पिंपरी चिंचवड प्रभारी सय्यद अकबर, पनवेलचे नगरसेवक मुकीत काझी, भाजपचे इफ्तीकार अत्तार, कैसर दणदणे, उरणच्या माजी उपनगराध्यक्ष नाहिदा ठाकूर, रशीद ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते. इमरान घट्टे यांनी सर्वांचे स्वागत व आभार प्रदर्शन केले.

## मासेमारीसाठी गेलेल्या २५ वर्षीय तरुणाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुका हा आदिवासी बहुल तालुका म्हणून ओळ–खला जातो. येथील कष्टकरी, श्रमजीवी, मजूर,मत्स्यव्यवसाईक व हातावर पोट असलेला श्रमिक वर्ग पोटापाण्यासाठी अविरत कष्ट उपसत असतो. असेच उदरनिर्वाहासाठी मासेमारीकरीता गेलेल्या शिळोशी गावचे पुलाजवळ अंबाजोड नदीच्या पाण्यात मासेमारीसाठी गेलेल्या एका व्यक्तीचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. पांडुरंग बाळाराम दळवी(२५) रा. टेम्भी वसाहत सुधागड, असे मयताचे नाव आहे. याप्रकरणी पाली पोलीस स्थानकात अकस्मात मृत्यू र नं ०९/२२ नुसार नोंद झाली असून पुढील तपास पाली पोलीस निरीक्षक विश्वजित काईनगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पाली पोलीस करीत आहेत.

## कर्जतची चिमुरडी खुशी हजारे पुन्हा झळकणार चित्रपटात

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत मधील चिमुरडी कलाकार खुशी हजारे' आपडी थापडी ' या चित्रपटातुन पुन्हा एकदा पडद्यावर झळकणार आहे, श्रेयस तळपदेच्या मुलीची भूमिका साकारणार आहे खुशी हजारे, ही बालकलाकार ऐश्वर्या राय सोबत काम केलं आहे.



श्रेयस तळपदेने त्याच्या वाढदिवसाच्या दिवशी आपल्या आगामी चित्रपटाची बातमी चाहत्यांसोबत शेअर केली. बऱ्याच कालावधीनंतर श्रेयस तळपदे मराठी सृष्टीकडे वळलेला पाहायला मिळाला. त्याने साकारलेली माझी तुझी रेशीमगाठ ही मालिका प्रेक्षकांची विशेष दाद मिळवताना दिसत आहे. लवकरच श्रेयस 'आपडी थापडी ' या चित्रपटातुन प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. नुकतेच या चित्रपटाचे चित्रीकरण सुरू करण्यात आले आहे. या चित्रपटात श्रेयस तळपदे सोबत अभिनेत्री मुक्ता बर्वे मुख्य भूमिकेत झळकणार आहे.

हे दोघेही दमदार कलाकार आपडी थापडी या कौटुंबिक जीवनावर आधारित चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. चित्रपटाचा पहिला प्रोमो नुकताच प्रेक्षकांच्या समोर आला आहे यात संदीप पाठक, नंदू माधव, नवीन प्रभाकर हे कलाकारसुद्धा महत्वाची बजावताना दिसणार आहेत. आपडी थापडी या चित्रपटात आणखी एक बालकलाकार झळकणार आहे जी मुक्ता बर्वे आणि श्रेयस तळपदे यांच्या मुलीच्या भूमिकेत दिसणार आहे. ही चिमुरडी आहे खुशी हजारे. खुशी हजारे ही बॉलिवूड चित्रपटातली बालकलाकार आहे. विकी कौशल सोबत 'भूत' , ऐश्वर्या रायसोबत 'सजबजीत', खानदानी शफाखाना असे बॉलिवूडचे चित्रपट खुशीने बालकलाकार म्हणून अभिनय केले आहेत. तसेच वजनदार आणि प्रवास या मराठी चित्रपटात देखील ती झळकली आहे. आपडी थापडी या आणखी एका मराठी चित्रपटातून खुशीला अभिनयाची संधी मिळत आहे. श्रेयस तळपदे आणि मुक्ता बर्वे यांच्यासोबत ती स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे.

चित्रपटासोबतच खुशीने टीव्ही जाहिरात क्षेत्रात देखील काम केलं आहे. खूप लहान असतानाच खुशीने पॅम्पर्स पॅन्टच्या ऍडमध्ये काम केले होते, ही तिची पहिली ऍड ठरली होती. गोल्डी गुलाबजाम, लेन्सकार्ट तसेच नुकतीच ब्रिटनिया गुडडे ची एक नवी ऍड टीव्हीवर पाहायला मिळाली या ऍडमध्ये खुशी देखील झळकली आहे. त्यामुळे खुशी एक बालकलाकार म्हणून बॉलिवूड तसेच मराठी सृष्टीत चांगलीच ओळखली जाऊ लागली आहे. आपडी थापडी या चित्रपटानिमित्त खुशी हजारे हिला खूप खूप शुभेच्छा!

# गिरणे ग्रामपंचायत सरपंच सौ.ज्योती पायगुडे यांनी बदलला गावाचा चेहरा मोहरा



**दै.रायगड नगरी । तळा**

रायगड जिल्ह्यात असलेल्या गिरणे या छोट्याश्या गावच्या सौ.ज्योती कैलास पयगुडे या सरपंच आहेत. सौ.पायगुडे २०१७ ला ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत थेट सरपंचपदी विजयी झाल्या. पण हा विजय काही सहजा सहजी मिळालेला नव्हता. विरोधकांनी सरपंचपदाच्या या निवडणूकीत शक्य तेवढे अडथळे आणले मात्र सर्व अडथळे पार करीत सौ.पायगुडे यांनी विजयाची पतका गिरणे गावाच्या ग्रामपंचायतीवर लावलीच.

त्यांच्या या विजयाने त्या तळा तालुक्यातील थेट सरपंच पदाच्या निवडणुकीत निवडून येणाऱ्या पहिल्या महिला सरपंच ठरल्या. यापूर्वी अनेक सरपंच गिरणे ग्रामपंचायतीमध्ये होऊन गेले परंतु पायगुडे यांच्या घरातील सुनेने गावचा कारभार हातात घेतला आणि संपूर्ण गावाचा चेहरामोहराच बदलून टाकला. स्वतःला विकासक म्हणणाऱ्या पुढाऱ्यांच्या डोळ्यात अंजन भरण्याचे काम पायगुडे यांनी त्यांच्या कामाच्या रुपाने केले. सरपंच झाल्यानंतर पायगुडे यांचे पूर्ण लक्ष हे गावाच्या विकासावर केंद्रीत झाले. गावाचा विकास हाच ध्यास त्यांच्या मनाने जणू घेतला.

याशिवाय पायगुडे या महिला बचत गट, रोजगार हमी योजना, शिक्षण, महिला सक्षमीकरणासाठी काम करतात त्याचप्रमाणे उज्वला गॅस योजना, अटल बिहारी पेन्शन योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना या योजनांचा नागरिकांना लाभ मिळून देणारी तळा तालुक्यातील गिरणे ही एकमेव ग्रामपंचायत आहे.

पायगुडे यांनी एकटीनेच या कार्याला वाहून घेतले असे नाही तर त्यांचे पती कैलास मुकुंद पायगुडे त्यांना त्यांच्या कार्यात मदत करत असतात. गिरणे ग्रामपंचायत विकासकामांचा आराखडा त्यांनी तयार केला आहे या दाम्पत्यांनी गावातील प्रत्येक कार्यात हिरीरीने सहभाग घेतला आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळेच या छोट्याश्या गावात विकासाची गंगा वाहू लागली आहे. जे गावकरी विकासापासून वंचित होते त्यांना प्रगतीच्या वाटेवर आणले आहे.

जिल्हा नियोजन अंतर्गत १० लक्ष(जनसुविधा) रुपयांचे स्मशान भूमी रोड कामाचा शुभारंभ सरपंच सौ ज्योती कैलास पायगुडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी कैलास मुकुंद पायगुडे, ग्रामपंचायत सदस्य रमेश लोखंडे, माजी सरपंच गोविंद कीर्तने, पोलीस पाटील सचिन नाक्ती, तंटा मुक्ती अध्यक्ष भगवान माळी, माजी अध्यक्ष जनार्धन कीर्तने, चंद्रकांत पाशीलकर, अशोक पाशीलकर, मराठा समाज तालुका अध्यक्ष सुभाष पासीलकर, नामदेव कीर्तने, नथुराम चव्हाण, बबन माळी, मनोहर पायगुडे, बाळकृष्ण पायगुडे, घनश्याम पाशीलकर, रमेश पाशीलकर, मनोज बैकर, मधुकर भुरे, संदीप पाशीलकर, विजय ताम्हणकर, शरद नाक्ती, आनंत नाक्ती, जयेंद्र पाशीलकर, लवलेश पाशीलकर, जयदास पायगुडे, पुष्पा पायगुडे, सुषमा पाशीलकर, लोचना जाधव, बाळू चव्हाण, गोविंद रोंगे, राजाराम पाशीलकर, शशिकांत माळी, बाळाराम कीर्तने, दगडू भगत, रवी व्हालेकरं, रोहिदास नाक्ती, काशिनाथ भगत, बुवा कीर्तने मोठया संख्येने गिरणे ग्रामस्थ महिला मंडळ उपस्थित होते.

# लोकसोयींनुसार माणगांव हेच जिल्ह्याचे ठिकाण व्हावे, माणगांवकरांना अजुनही आशा

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

रायगड जिल्ह्याचे विभाजन करुन दक्षिणभाग रायगड व उत्तरभाग पूर्वीचा कुलाबा जिल्हा करावा. रायगड जिल्ह्याचे मुख्य ठिकाण माणगांव असावे अशी नविन जिल्ह्याची मागणी गेल्या अनेक वर्षां पासून केली जात आहे. रायगड जिल्ह्याचा विस्तार पोलादपूर पासून उरण, कर्जत पर्यंत आहे. सध्याचे जिल्ह्याचे ठिकाण असलेले अलिबाग पर्यंतचे अंतर हे पोलादपूर, महाड, म्हसळा, श्रीवर्धन, माणगांव पासून लांब पल्ल्याचे आहे. तेथे कोणत्याही शासकिय कामानिमीत्त गेल्यास संपूर्ण दिवस जातो. त्यामुळे वेळ व आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. सध्या महाड येथे जिल्ह्याचे ठिकाण होणार असल्याचे खात्री लायक वृत्त चर्चेत आहे. परंतु पूराचा धोका व महाडची सद्यस्थिती पाहता तुलनात्मक दृष्ट्या त्यामानाने माणगांव हे मध्यवर्ती ठिकाण असल्याने तसेच महामार्गावरील उपलब्ध अनेक प्रकारच्या अगदी रेल्वे वाहतुकसह अनेक व्यवस्थेमुळे काही तासातच या ठिकाणी पोहचणे सहज सोपे आहे.

पर्यटनाच्या दृष्टीनेही पश्चिम घाटी अनेक पशू-पक्षी व नैसर्गिक वनसंपदा जंगले, भातशेती, भाजीपाला, कडधान्य शेती हिरवाईने नटलेला माणगांव तसेच येथुन जवळच असलेला रायगड किल्ल्याचे दर्शनही घेता येते. यासाठी माणगांव हेच जिल्ह्याचे ठिकाण होणे सोयीस्कर आहे. रायगड जिल्ह्याचे मुख्यालय माणगांव करुन तळा, माणगांव, म्हसळा, श्रीवर्धन, महाड,पोलादपूर व रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड, दापोली व खेड या तीन तालुक्यांचा समावेश होणाऱ्या नविन जिल्ह्यात करावा. कारण रत्नागिरी जिल्ह्यातील या तीन तालुक्यांचे रत्नागिरी पासुनचे अंतर खुप जास्त आहे. परंतु याच तालुक्यांचे माणगांव पर्यंतचे अंतर ७० ते ८० किमी. एवढे जवळचे आहे. त्यामुळे या तालुक्यातील लोकांना कामा निमीत्त नविन जिल्ह्याचे ठिकाण माणगांवला येणे सोयीस्कर होईल.

माणगांवला पावसाळी पूराचा धोका नाही. तसेच मुबलक बारामाही पाणी आहे. काळ प्रकल्पाच्या कालव्याचे पाणी उन्हाळ्यात मिळते. कोकणरेल्वेचे स्थानक आहे, मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गासह दिघी हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गही माणगांवातूनच जातो, पुणे जवळ आहे. मोठे बस स्थानक सोयी सुविधा व आगारही आहे. विळे भागाड औद्योगिक वसाहत आहे. दिल्ली मुंबई कॉरिडोअरचा प्रस्तावही आहे. या ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा सत्र न्यायालय, भव्य मध्यवर्ती प्रशासकिय भवन कार्यालय, पंचायत समितीचे भव्य कार्यालय, जलसंपदा विभागाचे कार्यालय तसेच प्रांत कार्यालय, पोलीस उप विभागीय कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, ब्रिटीश कालिन पोलीस कचेरी, अनेक शाळा, कॉलेज, बँका, पतपेढ्या अशा अनेक शैक्षणिक लोणेरे येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोकनेते अशोक साबळे विधी महाविद्यालय व अनेक शासकिय संस्था आहेत.

मोठमोठाली कॉम्प्लेक्स वेगाने वाढणाऱ्या लोक वसाहती, मुबलक पाणी व सोयी सुविधा व कोट्यावधींची पिण्याच्या पाण्याची कार्यरत योजना, शांततापूर्ण शहर अशीच माणगांवची खऱ्या अर्थाने ओळख आहे. नोकरी, व्यवसाय निमीत्ताने जो इथे आला तो इथेच स्थायिक झाला. जिल्ह्याला आवश्यक सर्व सोयी सुविधा याठिकाणी सहज उपलब्ध आहेत. त्या दृष्टीकोनातून या तालुक्याचा विकास करण्यात लोकनेते माजी आमदार कै. अशोकदादा साबळे, विद्यमान खासदार सुनिल तटकरे आणि येथिल सर्वच स्थानिक लोकप्रतिनीधी यांचे मोठे योगदान आहे.

कै. लोकनेते दादा साबळेंच्या नंतर तालुक्यात नेतृत्वाची पोकळी निर्माण झाल्याचे माणगांवकर बोलुनही दाखवितात. माणगांवच्या प्रांत प्रशाली जाधव-दिघावकर, तहसिलदार प्रियंका आयरे, मुख्याधिकारी राहुल इंगळे, पोलीस उपअधिक्षक प्रविण पाटील, वरिष्ठ पोलीस निरिक्षक अश्वनाथ खेडकर तसेच शिवसेना नेते ड. राजीव साबळे यांचे नेतृत्वात पुढील नवनिर्वाचीत नगराध्यक्ष, उप नगराध्यक्ष तसेच सर्व सभापती,नगर-सेवक,सेविका व माणगांव पंचायत समिती सभापती, उपसभापती, सदस्य, सर्वपक्षीय लोकप्रतिनीधी, व्यापारी संघटना, सामाजिक संस्था, या सर्वांनी एकत्रीतपणे जिल्ह्याच्या पालक मंत्री नामदार आदिती तटकरे, खासदार सुनिल तटकरे, आमदार भरतशेट गोगावले, आमदार अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून शासनाकडून आपला माणगांव तालुका हा लोकोपयोगी जिल्ह्याचे ठिकाण होण्यासाठी अजुनही प्रयत्नांची गरज आहे. अशी माणगांवकर जनतेची अभिलाषा आहे.

# बोर्ली ग्रामपंचायतीत करिअर मार्गदर्शन कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील बोर्ली ग्रामपंचायतीत तहसील कार्यालयाचे निवडणूक नायब तहसिलदार अमित पूरी यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील तरुणांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी मुरुड तहसील कार्यालयाचे निवडणूक नायब तहसीलदार अमित पूरी, अमोल शिंदे, महसूल अव्वल कारकून केतन भगत, ग्रामपंचायत सरपंच चेतन जावसेन, उपसरपंच मतीन सौदागर, मनोहर भोपी, ग्रामसेवक पी.जे.गाडेकर, कर्मचारी वर्ग उपस्थित होते. सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन दिपप्रज्वलननाने कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. तरुणांसाठी करिअर बाबत असलेल्या संधी व विद्यार्थ्यांना पसंती नुसार ज्या-त्या क्षेत्रात उपलब्ध असलेले विविध कोर्सेस याबाबत अमित पूरी यांनी महत्त्व पूर्ण माहिती दिली तर एम.पी.एस.सी.व यु.पी. एस.सी.परीक्षेबाबत केतन भगत यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

## जाहीर नोटीस

यादृारे नोटीस देण्यात येत आहे की, सत्यकुंज कॉम्प्लेक्स सहकारी गृहनिर्माण संस्था, प्लॉट क्र.४१ आणि ४२, फ्लॅट क्र.ई/१०१, सेक्टर-३६, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९ येथील श्री.अमोघ पांडुरंग जोशी आणि श्रीमती.कस्तुरी अमोघ जोशी यांच्या नावे खाली नमूद केल्याप्रमाणे मुळ समभाग प्रमाणपत्र हरविल्याची / गहाळ झाल्याची नोंद करण्यात आली आहे आणि हरवलेल्या / गहाळ झालेल्या मुळ समभाग प्रमाणपत्राच्या बदल्यात डुप्लिकेट समभाग प्रमाणपात्र जारी करण्यासाठीचा अर्ज संस्थेकडे करण्यात आला आहे.

श्री.अमोघ पांडुरंग जोशी आणि श्रीमती.कस्तुरी अमोघ जोशी यांना डुप्लिकेट समभाग प्रमाणपत्र देण्यावर कोणतीही व्यक्ती / कॉर्पोरेट यांना आक्षेप असल्यास ही सुचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत त्याचे / त्यांचे आक्षेप लेखी स्वरुपात संस्थेला कळवू शकतात. समभाग प्रमाणपत्राचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

फ्लॅट क्रमाक : इ/१०१ शेअर प्रमाणपत्र क्रमांक : ०८६
रु.५०/- चे पाच समभाग विभेदक क्रमांक ४२६ ते ४३० (दोन्ही धरुन)

**सही/-**
**ॲड.जयवंत विठ्ठल कांबळे**
**शॉप नं.३५, महालक्ष्मी मॉल,**
**प्लॉट नं.८/८बी, सेक्टर-३५,**
**कामोठे, नवी मुंबई-४१०२०९**

# मद्यसाठा हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील कोप्रोली गावाच्या हद्दीत बेकायदेशीररित्या देशी विदेशी मद्यसाठा करून त्याची विक्री करणाऱ्या एका इसमाविरोधात पनवेल तालुका पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्याच्याकडून हजारो रुपये किंमतीचा मद्यसाठा हस्तगत केला आहे.

कोप्रोली गावाच्या हद्दीत राहणाऱ्या किरण पाटील हा बेकायदेशीररित्या देशी-विदेशी मद्यसाठा करून त्याची विक्री करीत असल्याची माहिती वपोनि रवींद्र दौंडकर यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून त्या ठिकाणी जवळपास ६ हजार ७६० रुपये किंमतीचा देशी विदेशी मद्यसाठा हस्तगत केला आहे.

# मंदिराची दानपेटी फोडली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर येथील एका मंदिराची दानपेटी फोडून अज्ञात चोरट्यांनी लाखो रुपये चोरुन नेल्याची घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

खारघर येथे असलेल्या इस्कॉन मंदिरात अज्ञात चोरट्यांनी दानपेटी फोडून तेथे गोळा झालेले लाखो रुपये चोरुन नेले आहेत. या घटनेची माहिती मिळताच खारघर पोलीस घटनास्थळी रवाना झाले असून परिसरात असलेले सीसीटीव्ही आदींच्या माध्यमातून या अज्ञात चोरट्यांचा शोध खारघर पोलीस करीत आहेत.

## ग्रुप ग्रामपंचायत चिपळे

ता.पनवेल, जि.रायगड

## जाहीर निविदा

दि.३१/०१/२०२२

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रुप ग्रामपंचायत चिपळे हद्दीतील खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामपंचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि.०१/०२/२०२२ ते ०८/०२/२०२२ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि.०९/०२/२०२२ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे बोनशेत येथील प्राथमिक शाळेची पिण्याच्या पाण्याची टाकी व शौचालय दुरुस्ती करणे | १२८३१४ | ग्रामनिधी | ६ महिने |
| २ | मौजे बोनशेत येथील स्मशानभूमी येथे पाण्याची टाकी बसवून स्टॅण्ड पोस्ट बसविणे | २१२८६५ | ग्रामनिधी | ६ महिने |
| ३ | मौजे बोनशेत येथील स्मशानभूमी दुरुस्ती | २८४५३ | ग्रामनिधी | ६ महिने |
| ४ | मौजे कोप्रोली येथील गटार पाईप लाईन बसविणे | १८१६३३ | ग्रामनिधी | ६ महिने |
| ५ | मौजे कोप्रोली येथील अरिहंत अहरम व रॉयल मिडोज येथे पाईप गटार बांधणे | ४३८७०५ | ग्रामनिधी | ६ महिने |
| ६ | मौजे चिपळे येथील बबन पाटील ते रामदास पाटील यांच्या घरापर्यंत पाईप गटार करणे | १५८३७० | १५ वा वित्त आयोग | ६ महिने |
| ७ | मौजे चिपळे येथे लक्ष्मण पाटील यांचे घर ते चाळीपर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता बनविणे | ३५८७१८ | ग्रामनिधी | ६ महिने |
| ८ | मौजे कोप्रोली येथील मुख्य रस्ता ते अरिहंत अहरम / रॉयल मिडोज सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे | २५८३३० | ग्रामनिधी | ६ महिने |
| ९ | मौजे कोप्रोली मुख्य रस्ता ते शिवधारा सोसायटी / कॉलीटास गार्डन येथील सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे | ४९८५२५ | ग्रामनिधी | ६ महिने |
| १० | मौजे विहिघर येथील जुनी रा.जि.प.प्राथमिक शाळा विहिघर दुरुस्ती करणे | ४00000 | ग्रामनिधी | ६ महिने |
| ११ | मौजे चिपळे येथील मुख्य रस्ता ते उमेश म्हात्रे यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे | २६८८७४ | १५ वा वित्त आयोग | ६ महिने |

**अटी व शर्ती :-**

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये ५०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत चिपळे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत चिपळे**

राव साहेब

ॲड.सुधीर एस. म्हात्रे
ॲड.कल्याणी एस. पाटील-म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.६१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता. २३/०३/२०२२

१) श्री.गोपाळ महादू गाताडे व इतर — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

वरील अर्जदार यांचे मयत वडील / आजोबा कै.महादू धोंडू गाताडे हे अर्जदार ह्यांच्या घरी रसायनी, वावेघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे २०/०९/२०२० रोजी मयत झाले आहेत. त्याअर्थी अर्जदार श्री.गोपाळ महादू गाताडे, श्री.गुरुनाथ महादू गाताडे, श्री.अनंता महादू गाताडे, कु.रोशन हरिभाऊ गाताडे यांनी कै.महादू धोंडू गाताडे यांनी मयत कै.महादू धोंडू गाताडे ह्यांचे सदरचा वारसदाखला हा भविष्यात / आवश्यकता लागल्यास केवळ गरजेचे असल्याने सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**सर्व्हे नं.११८/५, क्षेत्र ०-६४-६०, आकार ६.७६**
**मौजे : कराडे खुर्द, ता.पनवेल, जि.रायगड**

वरील अर्जदाराने वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.३१ माहे १/२०२२ रोजी माझ्या सहीने दिले.

**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

ॲड.सागर गोंधळी
ॲड.राकेश दिघे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी क.स्तर साो.यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.७१/२०२२
ने.ता. २५/०२/२०२२

सौ.दिपाली महेंद्र म्हात्रे
वय : वर्षे, व्यवसाय :
पत्ता : रा.पिसार्वे, तळोजा ए.वी.ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल शहर महानगरपालिका
अ कडील मौजे : पिसार्वे, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम लोकांस या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार यांचे पती श्री.महेंद्र धर्मा म्हात्रे ह्यांचा जन्म दि.०१/०१/१९८६ रोजी रा.पिसार्वे, तळोजा ए.वी. ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. अर्जदार यांचे पती श्री.महेंद्र धर्मा म्हात्रे यांच्या जन्माची नोंद होण्यासंबंधी संबंधित महानगरपालिका यांस योग्य ते आदेश पारित करण्याकरिता अर्जदार सदरचे अर्ज मे.कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे जन्माचा दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुर कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे जन्माचा दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.३१ माहे ०१ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**

के.एम.सोनवणे साहेब यांचे कोर्ट

ॲड.मनोज वाय. पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज वरिष्ठ स्तर न्यायालय पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.१७०६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता. ११/०४/२०२२

आशा उर्फ आशाबाई चंद्रकांत जगताप व इतर — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

ज्याअर्थी अर्जदार नं.१ हिचे पती व अर्जदार नं.२ व ३ यांचे वडील कै. चंद्रकांत श्रीधर जगताप यांचा मृत्यू हा दि.११/०५/२०२१ रोजी रुक्मिणीबाई हॉस्पिटल, कल्याण (प.), ता.कल्याण, जि.ठाणे येथे झाला असून त्यांचे पश्चात त्यांना अर्जदार नं.१ ते ३ हेच कायदेशीर वारस आहेत. कै.चंद्रकांत श्रीधर जगताप यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

अर्जदार हिचे मयत पती नामे कै.चंद्रकांत श्रीधर जगताप यांनी त्यावेळी कर्जत येथे नुपूर कन्स्ट्रक्शन यांचेकडून पुढील वर्णनाची मिळकत नं.८४८/२ घर नं.७३, हि.सि.स.नं.९६, हिस्सा नं.३, क्षेत्र ०.५८.७ या क्षेत्रातील ४५६ चौ.फुट ही दहिवली, ता.कर्जत, जिल्हा : रायगड येथील मिळकत ही कै. चंद्रकांत श्रीधर जगताप यांचे नावे असलेल्या वर नमूद मिळकतीबाबत आणि शासकीय व निमशासकीय तथा महसूली दप्तरी कामकाजासाठी वारसदार म्हणून तसा वारस दाखला अर्जदार नं.१ ते ३ यांना मिळणेकामी सदरचा चौकशी अर्ज नं.१७०६/२०२१ अर्जदार यांनी मा.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) पनवेल या न्यायालयात दाखल केलेला आहे. तरी सदरचा वारस दाखला अर्जदार यांना मिळणेबाबत कोणचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे.न्यायालयात दाखल करण्यात यावी. याची सर्व जनतेने नोंद घ्यावी. वरील पद्धतीने कोणतीही लेखी हरकत किंवा तक्रार मुदतीत न आल्यास अर्जदार यांच्या विनंतीप्रमाणे वर नमूद केलेल्या मिळकतीबाबतचा वारस दाखला अर्जदारांचे लाभात देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा व तक्रारींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.३१/०१/२०२२ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.सोनवणे साहेब

प्रो.जमा.६-२५ — अर्जदाराचे वकील ॲड.विजय गडगे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर साो.यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्रं.८७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता. १९/०३/२०२२

अकील इकबाल पटेल
वय : ३६ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.तळोजा पाचनंद, तळोजा मजकूर,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

ज्याअर्थी मयत हजराबीबी उर्फ हजराबी अ.गफुर तांबडे ही दि.०२/०६/१९९४ रोजी मौजे : मु.तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावली असून ती मृत्यूपूर्वी मौजे : पाचनंद तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत होती. तीचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पिसार्वे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र-हे.ए.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| पिसार्वे | ३७ | ३/४/अ | ०-२९-८०<br>पो.ख. ०-००-५० | ५.३१ |

मयत हजराबीबी उर्फ हजराबी अ.गफुर तांबडे हिचे मृत्यूपश्चात तीस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार ना- हीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ३१/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

पृष्ठ क्र.१ वरुन...

# निवेदन उपविभागीय अधिकाऱ्यांना दिल्यानंतरच आंदोलनाची दिशा ठरणार

नाही तसेच घरांचे नुकसान होणार नाही. नुकसान झाल्यास योग्य मोबदला देण्यात यावा शेतकऱ्यांच्या वहिवाटचे मार्गाचे संरक्षण व्हावे नैसर्गिक पाण्याच्या वाटा मोकळ्या ठेवाव्या २०१३ च्या संपूर्ण भूसंपादन कायद्यनुसार शेतकऱ्यांना लाभ मिळावा ट्रस्ट वक्प बोर्डाच्या बाधित शेतकऱ्यांना पूर्ण लाभ मिळावे आदी मुद्यांवर चर्चा झाली.

यावेळी उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, जिल्हापरिषद सदस्य बाजीराव परदेशी, पी पी खारपाटील, माजी जिल्हापरिषद संतोष ठाकूर, उपसभापती शुभांगी पाटील, उरण सामाजिक संस्थेचे सरचिटणीस संतोष पवार, ग्राम पंचायत सदस्य समेश फोफेरकर, पी डी जोशी, ॲड विजय पाटील, ॲड निनाद नाईक ॲड प्रशांत पाटील, ॲड अविनाश नाईक, घनश्याम पाटील, राजाराम जोशी,रामनाथ पंडित, संजय ठाकूर, वेश्वी माजी सरपंच विलास पाटील, नितीन पंडित, रुपेश पाटील १६ गावातील सरपंच उपसरपंच सदस्य शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## जाखमाता क्रीडा मंडळाची हॅटट्रिक सलग तीन वर्षे श्रीवर्धनमध्ये प्रथम पारितोषिक विजेते

**दै.रायगड नगरी । शिस्ते**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील बालसेवा क्रीडा मंडळातर्फे ८व्या क्रीडा स्पर्धा आयोजित कब्बडी स्पर्धेत शिस्ते येथील जाखमात क्रीडा मंडळाने प्रथम पारितोषिक मिळवले. हे क्रीडा मंडळ सलग तीन वर्षे स्पर्धेत प्रथम पारितोषिके मिळवणारा जाखमाता शिस्ते हा हैट्रिक मारणारा तालुक्यातील पहिला संघ ठरला आहे. रविवारी ३० जानेवारी रोजी ही स्पर्धा संपन्न झाली.

अंतिम सामन्यात जाखमात शिस्ते व चिंचमाता बोर्ली यांच्यात अटीतटीची लढत झाला. दोन्ही संघाने एकमेकांवर आघाडी घेण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. मध्यांतरापर्यंत चिंचमाता ने ११-३ अशी सहा गुणांची आघाडी घेतली होती. चिंचमाता च्या आक्रमक खेळीने जाखमाता संघाला जखडून ठेवले होते. मात्र शेवटच्या पाच मिनिटात जाखमाता संघाने विजय खेचून आणला. शिस्ते च्या जाखमाता संघांच्या योगेश कांबळे, प्रकाश कांबळे यांनी खेळाची सुत्रे हातात घेऊन खेळ उंचावला. शेवटी १६-१३५ अशा तीन गुणांनी विजयी मिळवून जाखमाता संघ अव्वल ठरला.

या स्पर्धेत द्वितीय क्रमांक चिंचमाता बोर्ली, तृतीय क्रमांक शितलादेवी बोर्ली, तर चतृर्थ क्रमांक जाखमाता कापोली या संघाने पटकावले. शिस्तबद्ध संघाचा मान जगदंबा कापोली संघाला घोषित करण्यात आला. स्पर्धेत सर्वोत्कृष्ट खेळाडूचा मान हा जाखमाता शिस्ते संघाच्या योगेश कांबळे याला देण्यात आला तर उत्कृष्ठ पक्कड हा मान चिंचमाता बोर्ली संघाच्या सौगंध तोडणकरला देण्यात आला. मंदार तोडणकर, मुश्ताक गंग्रेकर शिस्ते ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच चंद्रकांत चाळके रायगड जिल्हा पोलिस पाटील संघटनेचे उपाध्यक्ष रत्नाकरजी पाटील यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर पाटील, उपाध्यक्ष किरण धुमाळ, कार्याध्यक्ष अनिल पांगारे सचिव महेंद्र धनावडे,सुशिल पाटील,विनय धुमाळ, प्रशांत पाटील सुनील पांगारे, जनार्दन धुमाळ व मंडळाचे सर्व सदस्य यांनी उत्तम कामगिरी करून स्पर्धा यशस्वी पार पाडली.

# इमारतीवरुन पडून मृत झालेल्या कामगाराचा अपघातात मृत्यू झाल्याची खोटी माहिती देणारा व्यावसायिक जेरबंद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लोखंडी ग्रील बसविताना पाचव्या मजल्यावरुन खाली पडून मृत झालेल्या प्रदिप मेश्राम (४३) या कामगाराला वाहनाची धडक लागल्याचे भासवून त्याला रुग्णालयात दाखल करुन पळ काढणाऱ्या दत्तात्रय किंद्रे (४६) या व्यावसायीकाचा पोलिसांनी शोध घेऊन त्याला जेरबंद केले आहे. मृत प्रदीप मेश्राम याच्या खिशामध्ये मोबाईल नंबर असलेली चिठ्ठी सापडल्याने पोलिसांनी सदर मोबाईलन नंबरवरुन माग काढत किंद्रे यांचा शोध घेऊन त्यांना या प्रकरणात अटक केली आहे.

या प्रकरणात अटक करण्यात आलेले व्यावसायीक दत्तात्रय किंद्रे हे कामोठे सेक्टर-२२ मध्ये राहण्यास असून ते डी.के.फेब्रीकेशन नावाने नवीन व जुन्या इमारतीमध्ये फेब्रीकेशनचे व जाळी बसविण्याचे काम करतात. त्यांच्या कामात मदतनीस म्हणुन त्यांनी मृत प्रदिप मेश्राम याला मागील काही महिन्यापासून सोबत घेतले होते. गत १२ जानेवारी पासून हे दोघेही कामोठे सेक्टर-२१ मधील तिरुपती बिल्डींग मधील पाचव्या मलजल्यावर ग्रीलचा पत्रा व ग्रील बसविण्याचे काम करत होते. १५ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास दोघेही किचनमधील रेलिंग कापून ग्रील काढण्याचे काम करत असताना प्रदीप मेश्राम याचा तोल गेल्याने तो किचनच्या खिडकीतून खाली पडून गंभीर जखमी झाला.

त्यामुळे दत्तात्रय किंद्रे यांनी जखमी प्रदीप मेश्राम याला तत्काळ कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करुन त्याला जेएनपीटी पळस्पे महामार्गावरील टी-पॉईट येथे अज्ञात वाहनाने धडक दिल्याची माहिती तेथील डॉक्टरांना दिली. तसेच रुग्णालयात आपला इर्टीगा कारचा व मोबाईलचा चुकीचा नंबर देऊन त्याठिकाणावरुन पळ काढला. उपचारादरम्यान प्रदिप मेश्राम याचा मृत्यू झाल्यानंतर रुग्णालयाने पनवेल शहर पोलिसांना संपर्क साधुन त्यांच्या हद्दीत झालेल्या अपघातातील मृताची माहिती दिली. त्यामुळे सहाय्यक पोलीस निरीक्षक निशांत धनावडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी तत्काळ रुग्णालयात धाव घेतली. मात्र मृत प्रदिप मेश्राम याला रुग्णालयात दाखल करणाऱ्या व्यक्तीचा मोबाईल नंबर व इर्टीगा कारचा नंबर चुकीचा असल्याने त्याच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

पोलिसांना मृत प्रदिप मेश्राम याचा इन्क्वेस्ट पंचनामा करताना, त्याच्या खिशामध्ये किंद्रे यांचा मोबाईल नंबर असलेली चिठ्ठी सापडली. सदर नंबर व रुग्णालयात त्याला दाखल करताना किंद्रे यांनी दिलेला मोबाईल नंबर हा काहीसा मिळता जुळता असल्याचे आढळुन आले. त्यानंतर पोलिसांनी प्रदिप मेश्राम याची माहिती काढली असता, तो किंद्रे यांच्यासोबत कामोठे येथे ग्रील बसविण्याचे काम करत असताना, इमारतीवरुन खाली पडल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी चिठ्ठीमध्ये सापडलेल्या मोबाईलवर संपर्क साधुन किंद्रे यांना पोलीस ठाण्यात बोलावून घेतल्यानंतर त्यांनी पोलिसांना खरी हकीकत सांगितली. त्यानुसार पोलिसांनी किंद्रे यांना अटक करुन कामोठे पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक निशांत धनावडे यांनी दिली.

# कर्जतमधील ज्येष्ठ नागरिक संस्थेस मिळाले स्वत:च्या हक्काचे कार्यालय

## नगरपरिषदे तर्फे वचनपूर्ती सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत मधील ज्येष्ठ नागरिक संस्थेस कार्यालय नव्हते, आम्हा ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी एखादं कार्यालय मिळावे अशी मागणी अनेक वर्षापासून ते नगरपरिषदेकडे करत होते, त्यांना नगरपरिषदेने कार्यालय उपलब्ध करून दिले, कार्यालयाचे हस्तांतर, वचनपूर्ती सोहळा नुकताच संपन्न झाला.

कर्जत नगर परिषद हद्दीतील नानामास्तर नगर मुद्रे तेथे असलेल्या व्यायाम शाळा (जिम ) वर नगरपरिषदेने ज्येष्ठ नागरिक संस्थेचे कार्यालय उपलब्ध करून दिले आहे. हे कार्यालयाच्या वचनपूर्ती सोहळ्याचा व हस्तांतराचा समारंभ नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या हस्ते संपन्न झाला, यावेळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ.पंकज पाटील, नगरसेविका भारती पालकर, संचिता पाटील, वैशाली मोरे, प्राची डेरवणकर, नगरसेवक राहुल डाळींबकर, ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्र नातू, माजी अध्यक्ष मोरेश्वर शहासने, मुकुंद मित्रगोत्री, अच्युत कोडगिरे, प्राजक्ता गरवारे आदींसह ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

कर्जत मधील ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी कार्यालय नव्हते, ज्येष्ठ नागरिक संस्थे तर्फे अनेक वर्ष नगर परिषदेकडे मागणी होत होती, नगराध्यक्ष सुवर्णा जोशी व नगरपरिषद प्रशासनाने आम्हाला कार्यालय उपलब्ध करून दिल्याने आम्हाला हक्काचे कार्यालय मिळाले आहे त्यामधून आम्ही आमच्या संस्थेचे काम करू असे सांगून संस्थने नगरपरिषदेचे आभार मानले आहे.



# मसाला बनविण्याचे प्रशिक्षण

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

नेहमीच समाजात विविधांगी उपक्रम राबविण्याऱ्या रोहे तालुक्यातील ग्रु. ग्रामपंचायत खांब व वसुंधरा कौशल्य विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने १५ वित्त आयोग अंतर्गत ग्रा.पंचायत कार्यालयात महिलांसाठी मसाला बनविण्याचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

या ३ दिवस चाललेल्या प्रशिक्षणास खांब विभागातील बचतगट महिला, गृहिणी, तरुणी अशा १०० हून अधिक महिला व तरूणींनी उस्फुर्त सहभाग घेतला होता.तर प्रशिक्षणासाठी सहभागी महिलांना प्रशस्तीपत्र देण्यात आले.तसेच यावेळी बनवलेल्या स्वादिष्ट बिर्याणीचा सर्वांनी आस्वाद घेतला. या प्रशिक्षण कार्यक्रम प्रसंगी ग्रामपंचायतीच्या सरपंच रंजना टवळे, उपसरपंच मनोज शिर्के, सर्व सदस्य,सभासद महिला होत्या. या उपक्रमास महेश चितळकर यांचे सहकार्य लाभले. ग्रा.पंचायतीचे माध्यमातून व वसुंधरा संस्था यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व महिलांना धन्यवाद देताना भविष्यात देखील अशाच प्रकारे महिला वर्ग व तरूणींसाठी उपयुक्त उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे उपसरपंच मनोज शिर्के यांनी माहिती देताना सांगितले.

# भाजी विक्रेता करतो दुकानात दारु विक्री ; खारघर पोलीस करणार कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर वसाहतीमध्ये बेकायदेशीररित्या भाजी विक्रेते करणारे फेरीवाले हे आता दारु विक्री सुद्धा करीत असल्याने त्यांच्या विरोधात खारघर पोलीस कारवाई करणार आहेत.

खारघर वसाहत ही नो लिकर झोन म्हणून शासनाने जाहीर केले आहे. त्यामुळे तेथे दारु विक्रीस बंदी आहे. असे असतानाही खारघर वसाहतीमधील अनेक अनधिकृत फेरीवाले हे भाजी विक्री करताना पाठीमागील बाजूस खुलेआम दारु विक्री करीत असल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.

या संदर्भात स्थानिक नागरिकांनी खारघर पोलीस व पनवेल महानगरपालिका यांना सुद्धा याची माहिती दिली असून कारवाईची मागणी केली आहे. त्यामुळे सदर व्हिडीओची चाचपणी करून त्यानुसार कारवाई करण्यात येणार आहे.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे : पळ-स्पे, ता.पनवेल, जि.रायगड येथील मालमत्ता / घर क्र.४२२, १६७ स्के.मी. मोकळी जागा व १२×११ चे पक्के बांधकाम (१८०० स्के.फुट) ही मिळकत आमचे अशिलांनी सदरील मिळकतीचे माालक श्री.सुनील महादेव पुसाळकर यांचेकडून कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर जमीन मिळकतींचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

सदर वर नमूद मिळकतीमध्ये अथवा तिच्या कोणत्याही भागावर कोणाचेही, कोणत्याही प्रकारचे करार मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेपट्टा, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास सदर व्यक्तींनी वा संबंधितांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करून सक्षम कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील विहित मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाहीत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरल्या जातील याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

पनवेल
दि.३१/०१/२०२२

**सही/-**
**ॲड.प्रदीप तु. भोईर**
**शॉप नं.९८, नगरपालिका कॉम्प्लेक्स, पहिला मजला, आद्य क्रांतीवर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२०६**
**मो.नं.८१०८२८२७००**

---

राव साहेब

ॲड.सारिका लबडे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र१३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता. १०/०३/२०२२

१) श्री.पंढरीनाथ धोंडू पाटील
वय : ५० वर्षे, धंदा : नोकरी / शेती
२) श्री.अनंत धोंडू पाटील
वय : ६३ वर्षे, धंदा : नोकरी / शेती
३) श्री.मारुती धोंडू पाटील
वय : ४५ वर्षे, धंदा : नोकरी / शेती
अर्जदार नं.१ ते ३ रा.मु.कासप, पो.आपटा, ता.पनवेल, जि.राायगड
४) सौ.कविता विष्णू ठोंबरे
पुर्वाश्रमीची कविता धोंडू पाटील
वय : ५२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.२, वडगाव, पाताळगंगा, पो.वाशिवली, ता.खालापूर, जि.रायगड
५) सौ.अंजना घनश्याम पाटील
पुर्वाश्रमीची अंजना धोंडू पाटील
वय : ४९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.पो.३८३, खालची आळी, आष्टे, पो.अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै.धोंडू पदू पाटील हे दि.२२/०९/१९८८ रोजी मरण पावले आहेत व ज्याअर्थी सदर मयत धोंडू पदू पाटील यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीची मिळकती महाराष्ट्र इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट ॲक्ट १९६१ च्या तरतुदींप्रमाणे पाताळगंगा एम.आय.डी.सी. करिता संपादीत करण्यात आल्या आहेत.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : कासप, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ. क्र. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र ए.गुं.आणा | नुकसान भरपाईची एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १९ | २ ब | ०-६३-९ | ४,२७,४६४/- |

आता सदर संपादीत मिळकतीच्या संपादनापोटी एम.आय.डी.सी. सदर मयत धोंडू पदू पाटील यांस वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारा भूखंड सदर अर्जदारांस मिळणेकरिता त्यांनी ते मयत धोंडू पदू पाटील यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने / इसमांनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.३१ माहे ०१ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत श्री.शिवराम लक्ष्मण पालकर रा.केवाळे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : हरिग्राम, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकत**

| भूमापन क्र. / उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ७७/२ अ | ०-५२-०० पो.ख. ०-०४-०० | १२.७ |

तरी वरील मिळकतीचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील आणि वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०१/०२/२०२२

**सही/-**
**वि.द.बापट वकील**
**१४, हेंन्द्रे बिल्डींग, बंदर रोड, पनवेल ४१०२०६**

---

मा.मुजावर साहेब ह्यांच्या न्यायालयात

अर्जदाराचे वकील
ॲड.बोबडे डि. टी.

### जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.७४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता. १४/०३/२०२२

१) श्रीमती.इंद्रावती देवी जगपती राम
वय : ६६ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) श्री.विजयकुमार जगपती राम
वय : ४९ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) श्री.महेंद्रकुमार जगपती राम
वय : ४० वर्षे, व्यवसाय : नोकरी
४) श्री.नरेंद्रकुमार जगपती राम
वय : ३९ वर्षे, व्यवसाय : नोकरी
सर्व अर्जदार रा.रुम नं.सी.३०३, तिसरा मजला, विक्रम कॉम्प्लेक्स को.ऑ.हौ.सो.लि., प्लॉट नं.०१, सेक्टर नं.१०, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या नोटीशीने कळविण्यात येते की, कै.जगपती बेचन राम यांचे निधन दि.२१ फेब्रुवारी २०२० रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल, कामोठे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे झाले असून, वर नमूद अर्जदार क्रमांक १ श्रीमती.इंद्रावती देवी जगपती ह्या कै.जगपती बेचन राम, यांची कायदेशीर पत्नी आहे. तसेच अर्जदार क्रमांक २, ३ व ४ हे त्यांचे मुलगे आहेत.

तसेच कै.जगपती बेचन राम यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | रुम नं. | क्षेत्र | रक्कम |
|---|---|---|---|
| कामोठे, पनवेल | रुम नं.सी.३०३, तिसरा मजला, विक्रम कॉम्प्लेक्स को. ऑ.हौ.सो.लि., प्लॉट नं.०१, सेक्टर नं.१०, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड | ६०.४८० चौ.मीटर बिल्टअप | रु.०७,४२,५००/- |

सदर कै.जगपती बेचन राम यांच्या मृत्यूनंतर सदरहू अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांच्या नावाची कै.जगपती बेचन राम यांचे वारस म्हणून नोंद होणे आवश्यक व गरजेचे आहे. त्याकरिता अर्जदार यांनी कै.जगपती बेचन राम यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला मिळविण्यासाठी मा.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस प्रदान करण्याच्या कामी कोणाच्याही कसल्याही हरकती असल्यास त्यांनी सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे.न्यायालयात हजर होवून हरकती दाखल कराव्यात. मुदत संपल्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांच्या लाभांत वारस दाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.३१/०१/२०२२ रोजी माझे सहीने व मा.न्यायालयाच्या शिक्क्याने नोटीस दिली.

**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे सो

प्रो.जमा. रु.५०/-
वारस दाखला

अर्जदार तर्फे वकील
ॲड.कैलास घरत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, पनवेल वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.२०६१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता. ०५/०३/२०२२

१) श्रीमती.ताराबाई विष्णू घरत
वय : ५८ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.अशोक विष्णू घरत
वय : ५६ वर्षे, धंदा :
३) श्री.हिरामण विष्णू घरत
वय : ५१ वर्षे, धंदा : नोकरी
४) श्री.जनार्दन विष्णू घरत
वय : ४७ वर्षे, धंदा : नोकरी
१ ते ३ रा.वरचे ओवळे, पो.पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड
५) श्रीमती.कुसुम गोपीनाथ नाईक
वय : ५३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.कोल्ही कोपर, पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड
६) सौ.वर्षा प्रल्हाद मुंडे
वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रिस मोहोपाडा, ता.खालापूर, जि.रायगड
७) सौ.सुरेखा रामनाथ घरत
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.नेरुळ, नवी मुंबई, ता.जि.ठाणे
८) श्रीमती.गीता अनिल गायकवाड
वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.ओवळे, पो.पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ८ यांचे वडील कै.विष्णू अंतु घरत यांचा मृत्यू दि.०२/०८/२०२१ रोजी शिवसाईस् डी.एच.एस. मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटल, करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेला आहे. तसेच कै. विष्णू अंतु घरत यांचा मृत्यू समयीचा कायमचा राहण्याचा पत्ता : करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड आहे. सबब कै.विष्णू अंतु घरत यांच्या मृत्यूनंतर अर्जदार क्र.१ व ८ हेच वारसदार आहेत.

कै.विष्णू अंतु घरत यांचे नावे असलेले भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**नोड : पुष्पक / वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| ०१ | संचिका क्र. | अनुज्ञेय क्षेत्र | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| | VOV-ICOGD-127 | १६१.४५ | पुष्पक/ वडघर | ०१ | ११२ | ४९० चौ.मी. |

वरील मिळकती व मिळकतीच्या अनुषंगाने मिळणाऱ्या भूखंडा संदर्भात व इतर फायदे याकरिता अर्जदार यांना वारस दाखला मिळणे करिता या मे.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस दाखला देण्याबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात योग्य त्या कागदपत्रकासह सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षी पुरावे नोंदवून अर्जदार यांना वारस दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.२८/०१/२०२२ रोजी कोर्टाच्या सहीशिक्क्याने दिली.

**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

प्रो.जमा-१००

अर्जदारातर्फे वकील
श्री.प्रसाद अ. कर्णिक

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात, पनवेल

दि.चौ.अर्ज क्रं.१९३५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२१/०३/२०२२

१) श्रीमती.वैशाली गणेश म्हात्रे
धंदा : गृहिणी, वय : ५१ वर्षे
२) श्री.विवेक गणेश म्हात्रे
धंदा : नोकरी, वय : २९ वर्षे
३) श्री.विशाल गणेश म्हात्रे
धंदा : नोकरी, वय : २५ वर्षे
वरील सर्व रा.मौजे : कामोठे, ५५२, हनुमान मंदिराजवळ, सेक्टर १४, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.दिपाली बाळाराम वाघमारे
धंदा : गृहिणी, वय : २७ वर्षे
रा.विठोबा मंदिराजवळ, चिंध्रण, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज हा गणेश हरी म्हात्रे, रा.मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड यांचे वारस असल्याबद्दलचा वारस दाखला मिळण्यासाठी दाखल केला आहे. गणेश हरी म्हात्रे यांचे दि.२०/०४/२०२१ रोजी त्यांचे राहत्या घरी मौजे : कामोठे, ५५२, हनुमान मंदिराजवळ, सेक्टर १४, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले आहे. अर्जदार क्र.१ ही कै.गणेश हरी म्हात्रे यांची पत्नी असून अर्जदार क्र.२ व ३ हे त्यांचे मुलगे असून अर्जदार क्र.४ ही त्यांची मुलगी आहे. कै.गणेश हरी म्हात्रे यांचे वडील हरी बाळ्या म्हात्रे यांच्या बाळ्या नथु म्हात्रे व महादेव बाळ्या म्हात्रे यांच्या मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे सामाईकातील काही शेतजमिनीच्या मिळकती होत्या. त्या शेतजमिनीच्या मिळकतींपैकी खालील वर्णनाच्या शेतजमिनीच्या मिळकती या कै.हरी बाळ्या म्हात्रे यांच्या हिश्श्यास आल्या होत्या.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| सर्व्हे नं. | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १५४ | १२+१३ | ०-४०-७ | ६.५१ |
| १५६ | १ | ०-०८-६ | १.३७ |

वर नमूद केलेल्या मिळकती या महाराष्ट्र शासनातर्फे सिडकोकडून दि.०३/०२/१९७० रोजीच्या परिपत्रकानुसार नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत करण्यात आल्या आहेत व त्याकामी मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे महाराष्ट्र शासनाच्या १२.५ टक्के नुकसान भरपाई योजनेनुसार ॲवॉर्ड हे युनिट केस क्र.कामोठे २२८/A नुसार जाहीर करण्यात येवून त्यामध्ये वर नमूद केलेलया मिळकती संबंधात कै.गणेश हरी म्हात्रे यांचे वडील म्हणजेच कै.हरी बाळ्या म्हात्रे यांना त्यांचे सहहिस्सेदारांचे समवेत वर नमूद केलेल्या मिळकती संबंधात लाभार्थी म्हणून घोषित करण्यात आले होते व त्याप्रमाणेची नोंद ही सदरील युनिट केसच्या सीसी फॉर्मचे सदरी करण्यात आली होती व आहे. अर्जदारांचे असे म्हणणे आहे की, हरी बाळ्या म्हात्रे यांचे निधनानंतर त्यांचे वारस म्हणजेच गणेश हरी म्हात्रे, बयाबाई हरी म्हात्रे आणि राम हरी म्हात्रे यांनी वर नमूद केलेल्या मिळकतीसंबंधात कै.हरी बाळ्या म्हात्रे यांचे वारस म्हणून वारस दाखला मिळविणेकरिता मा.दुसरे सह दिवाणी न्यायाधिश यांचे न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज क्र.११९/१९९५ हा दाखल करून त्यांनी कै.हरी बाळ्या म्हात्रे यांचे वारस असा वारस दाखला मिळविला होता. तसेच त्यानंतर दि.२७/०४/२०१३ रोजी गणेश हरी म्हात्रे व राम हरी म्हात्रे यांची आई बयाबाई हरी म्हात्रे हिचे निधन झाले. तेव्हा श्री.गणेश हरी म्हात्रे व त्यांचे भाऊ श्री.राम हरी म्हात्रे यांनी कै.बयाबाई हरी म्हात्रे यांचे वारस म्हणून वरील मिळकती संबंधात वारस दाखला मिळविणेसाठी पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज क्र.७७२/२०१३ अर्ज दाखल करून तसा वारस दाखला हा त्यांच्या लाभांत पारित करण्यात आला होता. सदरील गणेश हरी म्हात्रे यांचे निधन झाले असल्यामुळे कै.गणेश हरी म्हात्रे यांचा जो हिस्सा वर नमूद केलेल्या मिळकतींमध्ये निघत आहे तो त्यांच्या वर नमूद केलेल्या मिळकतीच्या पात्रतेप्रमाणे त्यांना मिळणारे भूखंड सिडको कॉर्पोरेशन यांचेकडून घेण्यासाठी प्रस्तुतचे अर्जदार हे गणेश हरी म्हात्रे यांचे वारस म्हणून वारस दाखला घेणे जरुरीचे आहे असे अर्जदारांना सिडकोचे संबंधित खात्याकडून सांगण्यात आल्यामुळे अर्जदार हे प्रस्तुतचा अर्ज दाखल करीत आहेत. मयत कै.गणेश हरी म्हात्रे यांना अर्जात नमूद केलेल्या अर्जदार क्र.१ ते ४ व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत व अर्जदार क्र.१ ते ४ हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. सबब अर्जदार क्र.१ ते ४ यांना सदरचा वारस दाखला मागण्याचा पूर्ण कायदेशीर हक्क आहे.

सदर नमूद मिळकतींमध्ये सदर वारस हक्कासंबंधी कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्या व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा वकीलांमार्फत या न्यायालयात हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीत व मुदतीत हरकती न आल्यास मे.न्यायालय अर्जदार यांच्या हक्कांबद्दल पुरावा घेण्याची कायदेशीर कारवाई करेल व अर्जदार क्र.१ ते ४ हे कै.गणेश हरी म्हात्रे यांचे वारस आहेत असा वारस दाखला मंजूर करेल. सदर नोटीस आज दि.२९/१/२२ रोजी न्यायालयाचे सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## मुरुडमध्ये जंजिरा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । मुरुड**

रायगड प्रेस क्लब व मुरुड तालुका पत्रकार संघाच्या वतीने ३१ जानेवारी हा दिवस जंजिरा मुक्ती संग्राम दिन म्हणून उत्सहात साजरा करण्यात आला.रायगड प्रेस क्लबचे संस्थापक ज्येष्ठ पत्रकार एस एम देशमुख यांच्या संकल्पनेतून गेल्या अनेक वर्षांपासून मुरुड तालुका पत्रकार संघ व प्रेस क्लब यांच्या विद्यमाने जंजिरा मुक्ती संग्राम दिन साजरा केला जातो. आज सकाळीच आझाद चौकात ध्वजा रोहण करण्यासाठी मुरुड शहरातील असंख्य नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

आझाद चौकात सकाळी ८ १५ वाजता मुरुड नगरपरिषदेचे प्रशासक व मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी पोलीस निरीक्षक नितीन गवारे, नायब तहसीलदार गोविंद कौटुंबे, माजी तहसीलदार नयन कर्णिक, नगरसेवक प्रमोद भायदे, योगिता ठाकूर, राष्ट्रपती पुरस्कार विजेते अजित कारभारी, प्रवासी संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत सुर्वे,सुनील शेळके, एकदरा सरपंच रामकृष्ण आगरकर,रायगड जिल्हा प्रेस क्लबचे अध्यक्ष भारत रांजणकर, मुरुड तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष सिराज शेख,सचिव सुधीर नाझरे, खजिनदार गणेश चोडणेकर, सहसचिव नितीन शेडगे, प्रकाश सादरे, माजी अध्यक्ष मेघराज जाधव, पाणी पुरवठा सभापती पांडुरंग आरेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी ध्वजारोहण झाल्यावर माजी अध्यक्ष मेघराज जाधव यांनी जंजिरा मुक्ती संग्राम विषयी माहिती सांगताना सांगितले कि, १५ ऑगस्ट १९४७ ला स्वांतत्र्य मिळाल्यानंतर तब्बल साडेपाच महिन्यानंतर जंजिऱ्याच्या नवाबाने भारत सरकारच्या शामिल नाम्यावर स्वाक्षरी केल्याने खऱ्या अर्थाने मुरुड श्रीवर्धन व म्हसळा हे तीन तालुके भारतात शामिल झाले होते.भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही हे तीन तालुक्याचा कारभार जंजिऱ्याचे नवाब चालवत होते.

स्वांतत्र्य मिळाल्यानंतर हि नावाबचे अधिपत्य नसावे यासाठी स्वतन्त्रय चळवळ निर्माण झाली.संपूर्ण भारतात ५२४ संस्थाने होती.तत्कालीन गृहमंत्री सरदार वालभभाई पटेल यांनी सर्व संस्थानिक याना भारतात शामिल होण्याचे एक प्रपत्रक काढले.त्या अनुषंगाने जंजिऱ्याचे नवाब यांनी ३१ जानेवारी १९४८ रोजी शामिल नाम्यावर सही केली तेव्हा खऱ्या अर्थाने हे तीन तालुके भारतात शामिल झाले होते.

# कुडाळच्या बिलिमारोने जिंकले राज्यस्तरीय अटल करंडक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय अटल करंडक स्पर्धा कोण जिंकणार याची महाराष्ट्राला लागलेली उत्सुकता अखेर रविवारी संपली. तीन दिवस चाललेल्या महाअंतिम फेरीत 'ढ' मंडळी कुडाळ या संस्थेच्या बिलिमारो या एकांकिकाने सर्वोत्कृष्ट कामगिरी करत एक लाख रुपये आणि मानाचा करंडक असे स्वरूप असलेला प्रथम क्रमांक पटकावून मानाच्या आठव्या अटल करंडकावर आपले नाव कोरले. सर्वोत्कष्ठ अभिनेताचा किताब बिलिमारो एकांकिकांमधील रंगा, सर्वोत्कष्ठ अभिनेत्रीचा किताब हायब्रिड एकांकिकांमधील ज्ञानेश्वरी मंडलिक हिने पटकाविले. तसेच मराठी रंगभूमीला समृद्ध करणारे ज्येष्ठ दिग्दर्शक प्रकाश बुद्धीसागर यांना जीवन गौरव स्वरूपात 'गौरव रंगभूमीचा' हा पुरस्कार देऊन यावेळी सन्मानित करण्यात आले. ५० हजार रुपये, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे स्वरूप पुरस्काराचे होते.

शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध कला दिग्दर्शक नितिन चंद्रकांत देसाई, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रसाद कांबळी, महापौर डॉ. कविता चौतमोल, स्पर्धेचे ब्रँड अँबेसिडर ओमकार भोजने, अभिनेते मंगेश कदम, परीक्षक सुप्रसिद्ध दिग्दर्शक व अभिनेते विजय केंकरे, सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे, सुप्रसिद्ध लेखक व अभिनेता संजय मोने, सुप्रसिद्ध लेखक डॉ. नितीन आरेकर, सुप्रसिद्ध अभिनेता भरत सावले, हास्य जत्रा फेम शिवाली परब, वनिता खरात, निखिल बने, स्पर्धा सचिव श्यामनाथ पुंडे, भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे, जनार्दन भगत



शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी देशमुख, सुप्रसिद्ध सिने नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, श्री व सौ नील कोठारी, प्राथमिक फेरीचे परीक्षक अभिजीत झुंजारराव, प्रमोद शेलार, अमोल खेर, स्मिता गांधी, नगरसेविका चारुशीला घरत, दर्शना भोईर, रुचिता लोंढे, भाजप युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष मयूरेश नेतकर, पनवेल शहर अध्यक्ष रोहित जगताप, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, कोकण विभाग सांस्कृतीक प्रकोष्ठच्या सहसंयोजिका अक्षया चितळे उपस्थित होते

समारंभाच्या अध्यक्षीय भाषणात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी म्हंटले कि, लहानपणी आपण कोणते क्षेत्र चमकणार हे माहिती नसते. चांगली दिशा घेतली असेल आणि त्याला घडवण्याचे डायरेक्ट - इन डायरेक्ट प्रयत्न लहानपणी केले तर भावी काळातील एक मोठे व्यक्तिमत्व तयार झालेले आपल्याला दिसते. मी ही असाच एक गरीब मजुरी करणारा मुलगा होतो. पण शिक्षण झाले शिक्षकाची नोकरी लागली. मला मराठी वाङ:मयाची आवड होती. साहित्याची गोडी असल्याने नाटक बघायला जाण्याचा मला छंद होता. मी वेळ मिळेल तेव्हा ठाण्याला गडकरी रंगायतन, दादरला शिवाजी मंदिर, रवींद्र नाट्य मंदिर ते विलेपार्ले पर्यंत तेव्हा जात होतो त्यावेळी मी प्रशांत आणि परेशला घेऊन जात असे. त्यावेळी मला माहीत नव्हते पुढे जाऊन ते अशा एकांकिका स्पर्धा भरवतील. आज तुम्ही उभ्या महाराष्ट्रातून आलात. आम्हाला आमच्या आयुष्यात जे जमले नाही ते काम तुम्ही छान पैकी केले, त्याचा मला अभिमान आहे. भावी काळातले तुम्ही चमकते तारे असणार आहात. तुमचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे. आपल्यासारखी नाट्यवेडी मंडळी खर्या अर्थाने मराठी संस्कृती जागृत ठेवण्याचे काम करतात. मराठी माणूस ज्या क्षेत्रात जातो तेथे वेडा होतो. राजकारण आणि समाजकारण या क्षेत्रात काम करणे आणि कला गाजवणे हा फार मोठा गुण आहे. त्या दृष्टीने तुम्ही फार मोठे कलाकार व्हा. मोठी व्यक्ती व्हा, अशा शब्दात त्यांनी नवोदित कलाकारांना आशिर्वाद दिला. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणात सांगितले कि, ही स्पर्धा आमच्यासाठी अभिमानास्पद आहे. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून आम्ही २००५ मध्ये मल्हार नाट्य करंडकाच्याद्वारे रायगड जिल्हास्तरीय नाट्य स्पर्धा सुरू केली होती. या मध्ये आमचा हेतू अतिशय प्रामाणिक असा होता. येथील कलाकारांना प्रोत्साहन देणे, कलेला उत्तेजन देणे आणि याद्वारे कलेची सेवा करणे. पनवेल क्षेत्रात जास्तीत जास्त नाट्य संस्कृतीचा प्रचार व्हावा यासाठी प्रयत्न करणे या प्रामाणिक हेतूने आम्ही स्पर्धा सुरू केली होती. २०१४ मध्ये आम्ही हि स्पर्धा राज्यातील इतर जिल्ह्यांपर्यंत पोहचण्यासाठी अखिल भारतीय नाट्य परिषदेचे पनवेल शाखा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सूचनेनुसार अटल करंडक राज्यस्तरीय नाट्य स्पर्धा सुरू केली. तेव्हापासून आम्हाला चांगला प्रतिसाद लाभलेला आहे, कारण या स्पर्धेच्या आयोजनाच्या मागे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचा अतिशय मोलाचा सहभाग आहे.

# ज्योत्स्ना केसरकर यांनी केला 'सन्मान मैत्रिणींचा' कौतुक सोहळा

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

नगरपंचायत पोलादपूरच्या जवळजवळ सर्वच प्रभागांमध्ये महिला उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले असल्याने बहुसंख्य महिला निवडून आल्या आणि आता नगराध्यक्षपदासाठी महिला आरक्षण जाहिर झाले असल्याने आपल्याच मैत्रिणींपैकी नगराध्यक्षा होणार असल्याचे निश्चित आहे. यामुळे पक्ष कोणाचाही असो मैत्रिणींचाच पोल-ादपूर शहरात वरचष्मा असेल, असे मत तांबडभुवन येथील सामाजिक कार्यकर्त्या ज्योत्स्ना केसरकर यांनी स्वत: आयोजित केलेल्या 'सन्मान मैत्रिणींचा' कौतुक सोहळ्याप्रसंगी व्यक्त केले.

पोलादपूर शहरातील अस्मिता पवार, सोनल गायकवाड, श्रावणी शहा तसेच निखिल कापडेकर यांच्या मातोश्री लतिका कापडेकर या चौघींच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन सन्मान मैत्रिणींचा या उपक्रमाद्वारे ज्योत्स्ना केसरकर यांनी केले. याप्रसंगी आयोजिका ज्योत्स्ना केसरकर यांनी नगराध्यक्षपदाची निवडणूक महिला आरक्षणामुळे रंगतदार ठरून अस्मिता पवार निवडून येईल की सोनल गायकवाड अशी उत्सुकता असली तरी आपलीच मैत्रीण निवडून येईल, याबाबत खात्री असल्याने राजकारण संपले असून आता मैत्रिणींनी पुन्हा एकत्र येण्याचा हा आनंदसोहळा असल्याचे यावेळी सांगितले.

# होममिनीस्टर आणि उखाण्याने रंगला राष्ट्रवादी पेणचा हळदी-कुंकू कार्यक्रम

## अभिनेत्री पूजा सावंत यांची प्रमुख उपस्थिती



**दै.रायगड नगरी । पेण**

पेण शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे हळदी कुंकु व होम मिनिस्टर, उखाणे व संगीत खुर्ची कार्यक्रम गांधी मंदीर येथे संपन्न झाला. या स्पर्धेत आरती दळवी यांनी पैठणी जिंकत प्रथम क्रमांक पटकाविला. यावेळी सिने अभिनेत्री पूजा सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती.

आमदार अनिकेत तटकरे यांच्या संकल्पनेतून सदर हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हळदीकुंकू कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने महिलांची उपस्थिती होती. उपस्थित महिलांना हळदी कुंकु, तीळगुळ, सौभाग्याचे वाण व चटई भेट देण्यात आली.

सदर कार्यक्रमास आमदार अनिकेत तटकरे, सिने अभिनेत्री पूजा सावंत, वेदांती अनिकेत तटकरे, जिल्हा महिला अध्यक्ष गीता पारलेजा, महिला नेत्या लीना बाफणा, नगरसेविका वसुधा पाटील, सरपंच रश्मी भगत, मंजुळा घासे, संतोष शृंगारपुरे, यशवंत घासे, नरेंद्र ठाकूर, दयानंद भगत, शहर अध्यक्ष जितू ठाकूर, उपाध्यक्ष विशाल बाफणा आदींसह राष्ट्रवादीचे कार्यक्रतेबव महिला उपस्थित होत्या.

यावेळी झालेल्या होम मिनिस्टर, उखाणे व संगीत खुर्ची कार्यक्रमात आरती दळवी यांनी प्रथम क्रमांक मिळवीत पैठणी जिंकली तर द्वितीय क्रमांक रेश्मा साळुंखे यांना बाफणा ज्वेलर्स कडून सोन्याची नथ देण्यात आली. तुतीय क्रमांक संगीता जोशी, चतुर्थ क्रमांक छाया पाटील तर पाचवा क्रमांक नंदिनी म्हात्रे यांनी पटकाविला. उपस्थित महिलांना आमदार अनिकेत तटकरे, सिने अभिनेत्री पूजा सावंत, वेदांती अनिकेत तटकरे यांनी मार्गदर्शन केले.


# भविष्यात जेएनपीटीला वर्षाकाठी रॉयल्टीतूनच मिळणार दोन हजार कोटी

## येत्या मार्च - एप्रिल दरम्यान कामगार विश्वस्तांसाठी निवडणूक

**दै.रायगड नगरी । उरण**

जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट रद्द होऊन १ डिसेंबर २०२१ पासून जेएनपीटी थोरिटी क्ट अस्तित्वात आला आहे.यामुळे बंदर प्रशासनाची निर्णय क्षमता वाढली आहे.भविष्यात जेएनपीटीला वर्षाकाठी दोन हजार कोटी फक्त रॉयल्टीतुनच आर्थिक लाभ मिळणार असल्याची माहिती कामगार विश्वस्त भुषण पाटील यांनी दिली आहे.

जेएनपीटी अंतर्गत असलेल्या विविध बंदरांचे खासगीकरण करण्यात आले आहे.१९९९ च्या सुरुव-ातीपासुन १४ जानेवारी २०२२ पर्यत केंद्र सरकारच्या खासगीकरण व कामगार विरोधी धोरणास सातत्याने



कायम विरोधच दर्शविला आहे.२४ डिसेंबर २०२१ रोजीही जेएनपीटीच्या कंटेनर टर्मिनलचे पीपीपी तत्वावर खासगीकरणासाठी आलेल्या जागतिक स्तरावरील निविदानाही प्रखरपणे आपण विरोध नोंदविला असल्याची माहिती कामगार ट्रस्टी भुषण यांनी दिली आहे. जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट रद्द होऊन १ डिसेंबर २०२१ पासून जेएनपीटी थोरिटी क्ट अस्तित्वात आला आहे.यामुळे जेएनपीटी बंदर प्रशासनाची निर्णय क्षमता वाढणार आहे. या ॲक्टमुळे जेएनपीटीला मालमत्ता विक्रीचे अधिकार मिळाले आ-हेत.तसेच बंदराकडे जमा असलेल्या सुमारे सहा हजार कोटी सीआरएस फंड कशासाठी व कुठे खर्च करावा यासाठीही जेएनपीटी प्रशासन सक्षमपणे निर्णय घेऊ शकते.क्टचे जितके फायदे तितकेच तोटेही आहेत. जेएनपीटी कामगार ट्रस्टींच्या दोन पदासाठी येत्या मार्च-एप्रिल दरम्यान निवडणूक होणार असल्याचेही भुषण पाटील यांनी सांगितले.

# पेण पोलिसांच्या कस्टडीमधून पळून गेलेला आरोपी पेणमध्येच सापडला

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण येथील एसबीआय बँकेच्या एटीएम मशीन वर दरोडा टाकून ५६ लाख ३४ हजार ८०० रुपये रोकड घेऊन पळून गेलेल्या दरोडेखोरांनी पेण पोलिसांचा व्याप वाढवला असतानाच आज रविवारी सकाळी पुन्हा पेण पोलिसांच्या जेल मधील आरोपीने पलायन केल्याने पेण पोलिसांच्याच कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. मात्र पेण शहरातील एका बँक परिसरात एक संशयित व्यक्ती दुपार पासून फिरत असल्याचा फोन त्याच बँकेच्या सिक्युरिटीने रात्री संशय आल्याने पेण पोलिसांना केला असता तिथे पोलीस गेल्यानंतर सदर व्यक्ती हा पळून गेलेला आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर त्या आरोपीस पेण पोलिसांनी पकडले असून पुन्हा अटक करण्यात आली आहे.

या बाबत सविस्तर वृत्त असे कि, वडखळ पोलीस स्टेशनच्या हद्दीतील पाबळ जवळील कार्ली गावात झारखंड येथील पोकलन ऑपरेटर राजेंद्र यादव ( वय ४२, रा.झारखंड) याच्यावर त्याचा सहाय्यक असलेला बिरु गणेश महातो ( वय १९, रा.झारखंड ) याने किरकोळ कारणावरून धारदार कोयत्याने वार करुन त्यास गंभीर जखमी करण्याची घटना २८ जानेवारीला घडली होती. या प्रकरणी वडखळ पोलिसांनी गुन्हा रजिस्टर क्र.१६ / २०२२ भा.द.वि कलम ३०७ अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपी बिरु महातो याला अटक केली होती. या आरोपीला पेण पोलीस ठाण्याच्या पोलीस कस्टडी मध्ये ठेवण्यात आले होते. रविवारी या आरोपीला प्रातविधीसाठी सकाळी बाहेर काढण्यात आले होते. मात्र आरोपी बिरु महातो याने शौचालयाच्या बाजूस असलेल्या भिंतीवरून उडी मारुन मागील बाजूने प्रभू आळी मार्गे पलायन केले.

कस्टडीतील आरोपी पळाल्याची माहिती मिळताच पेण पोलिसांची एकच धावपळ उडाली. या आरोपीच्या शोधात जवळपास अखखे पोलीस स्टेशन व उद्ध टीम पेण शहर, मुंबई - गोवा महामार्ग, पनवेल, पेण खोपोली रोड, रेल्वे स्टेशन, बस स्टँड परिसरात शोध घेत होते. या आरोपीच्या तपासा साठी गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस देखील पेणचा परिसर पिंजून काढत होते. सायंकाळी उशिरा पर्यंत हा आरोपी पोलिसांना सापडून आला नसल्याने पेण पोलीस स्टेशन मध्ये तक्रारही नोंदविण्यात आली आहे.

मात्र पेण शहरातील एका बँक परिसरात एक संशयित व्यक्ती दुपार पासून फिरत असल्याचा फोन त्याच बँकेच्या सिक्युरिटीने रात्री संशय आल्याने पेण पोलिसांना केला. तिथे पोलीस गेल्यानंतर सदर व्यक्ती हा जेल मधून पळून गेलेला आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर त्या आरोपीस पेण पोलिसांनी पकडले असून पुन्हा अटक करण्यात आली आहे.

# एसटी कर्मचारी अरबाज शिलोस्करच्या प्रसंगावधानतेमुळे चिमुरडीला मिळाले तिचे माता पिता

**दै.रायगड नगरी । पाली/णसे**

रायगड जिल्ह्यातील मुंबई गोवा महामार्गावर रामवाडी येथील एस टी महामंडळाच्या विभागीय कार्यशाळेत कामगार म्हणून कार्यरत असणारे अरबाज अजीज शिलोस्कर हे आपली ड्यूटी संपून घरी जाण्यास येत असताना त्यांना एक ४ वर्षांची अज्ञात मुलगी महामार्गावर एकटी सापडली. काहीशी भेदरलेली व सैरवैर धावणारी ही चिमुरडी अरबाजच्या नजरेत आली. यावेळी एस.टी चे कर्मचारी अरबाज अजीज शीलोस्कर यांनी समयसूचकता राखत त्या मुलीची विचारपूस केली असता तिला काही बोलता येईना, अशा वेळी अरबाज यांनी रामवाडी गावात जाऊन प्रत्येक घरी मुलीची ओळख पटवून घेण्याचा प्रयत्न करीत असताना एका घरी अज्ञात मुलीचे वडील सापडले व ती व्यक्तीच त्या मुलीचे खरे वडील आहेत का याची देखील खात्रीपूर्वक चौकशी अरबाज यांनी त्यांच्या घराच्या शेजारी राहणाऱ्या व्यक्तींकडून करून घेतली. त्यानंतरच अरबाज यांनी त्या लहान मुलीला तिच्या आई वडिलांच्या स्वाधीन केले तसेच पालकांना समज देऊन आपल्या पाल्याची काळजी घ्यावयास सांगितले. सध्या लहान मुलांना पळवण-



ारी टोळी सक्रिय झाली असून बालकांचे होणारे अपहरण, अत्याचाराच्या घटना घडत असल्याचा बातम्या रोज कानी पडत असून समस्त पालकांनी आपल्या पाल्याची काळजी घेऊन सतर्कतेने राहण्याचे आव-ाहन अरबाज शिलोस्कर यांनी केले आहे.

दरम्यान काही दिवसांपूर्वी पेण तालुक्यात मुले चोरणारी टोळी सक्रिय झाल्याची व्हिडीओ बातमी समाजमाध्यमांवर फिरत होती, अशातच आईवडिलांनी आपल्या मुलांवर लक्ष ठेवावे, मुले कुठे जातात कुठे खेळतात, यावर बारीक लक्ष ठेवावे अन्यथा कोणतीही दुर्घटना घडण्याची शक्यता सुजाण व ज्येष्ठ नागरिक व्यक्त करीत आहेत.

# भाजपा हा एकमेव राजकीय पक्ष आहे जिथे कार्यकर्त्यांनी पाहिलेली स्वप्न पूर्ण होतात : हाजी जमाल सिद्दीकी

## पनवेलमध्ये भाजपाच्या अल्पसंख्यांक मोर्चाची कोकण विभागीय आढावा बैठक संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कार्यकर्त्यांनी आपल्या समोर ध्येय ठेवले पाहिजे तसेच त्यांनी स्वप्नदेखील पाहिली पाहिजेत कारण भारतीय जनता पार्टी हा एकमेव असा राजकीय पक्ष आहे ज्या पक्षात कार्यकर्त्यांनी पाहिलेली स्वप्न पूर्ण होतात. असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे अल्पसंख्यांक मोर्चा राष्ट्रीय अध्यक्ष हाजी जमाल सिद्दीकी यांनी केले. ते पनवेल येथे आयोजित कोकण विभागीय आढावा बैठकी मध्ये बोलत होते. भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक मोर्चा चे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर यांनी या शानदार आढावा बैठकीचे आयोजन केले होते.

आपल्या भाषणात हाजी जमाल सिद्दिकी पुढे म्हणाले की अल्पसंख्यांक समाजाला एका सक्षम राजकीय पक्षाची आवश्यकता आहे. आणि तो पक्ष म्हणजे भारतीय जनता पार्टी आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस सारख्या पक्षांनी अल्पसंख्यांक समाज हा त्यांची व्होट बँक असल्याचे गृहीत धरले आहे. परंतु सबका साथ सबका विकास! असे म्हणत जे देशाचे नेतृत्व सक्षमपणे करत आहेत असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी अल्पसंख्यांक



समाजाने त्यांच्या पाठी खंबीरपणे उभे राहणे गरजेचे आहे. ज्यांनी सर्वप्रथम देश मग पक्ष आणि नंतर मी असे सूत्र आपल्याला दिले आहे.

भारतीय जनता पार्टीमध्ये सक्षम आणि पक्ष विचाराला समर्पित झालेला कार्यकर्ताच पुढे जाऊ शकतो, येथे वशिलेबाजी वर पुढे जाणे जवळ जवळ अशक्य आहे. मी पदाधिकाऱ्यांना विनंती करेन की त्यांनी जास्तीत जास्त प्रवास करून बूथ, मंडल, जिल्हा पिंजून काढले पाहिजेत. हे करत असताना आपले अर्थार्जन आपल्यालाच करायचे आहे. कारण भारतीय जनता पार्टीचा हा उसुल आहे की ना मै खाऊंगा ना किसी को खाने दुंगा. त्यामुळे आपला व्यवसाय, कारभार,नोकऱ्या हे सारे सांभाळून आपल्याला संघटन मजबूत करायचे आहे. संघटन हे समूहाचे काम आहे, त्यामुळे जास्तीत जास्त लोक जोडून सगळ्यांनी मिळून ते केल्यास ते अधिक प्रभावीपणे होते.

या आढावा बैठकीमध्ये राष्ट्रीय अध्यक्ष हाजी जमाल सिद्दिकी, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष हाजी इजाज देशमुख, पनवेल महानगर पालिकेचे सभागृह नेते परेश शेट ठाकूर, पनवेल तालुका अध्यक्ष अरुण शेठ भगत, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस अतिक खान, महाराष्ट्र प्रदेश सचिव बबलू सय्यद, प्रदेश उपाध्यक्ष महबूब खैरवा, प्रदेश उपाध्यक्ष युसुफ पठाण, कार्यकारिणी सदस्य अनिस अन्सारी, प्रदेश उपाध्यक्ष तथा नवी मुंबई महानगरपालिका नगरसेवक मुनोवर पटेल, पनवेल शहर उपाध्यक्ष अमरीश मोकल, तबस्सूम बैरागदार, इफ्तेखार आतार, जसिन ब्यास, रियान तुंगेकर, निसार सय्यद, साबीर शेख आदी मान्यवर यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुप्रसिद्ध निवेदिका सुमेधा लिम्हण यांनी सुमधुर आवाजात कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.